राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान सन २०२६-२७
मध्ये राबविण्यासाठी वार्षिक कृती आराखड्यास
प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : कृवपदुम-१३०२५/४८/२०२६-MAG-२A (E-१६४३३५५)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय, विस्तार, मुंबई-४०००३२

दिनांक : ०५ मे, २०२६

वाचा :-

१) सह सचिव, कृषि व शेतकरी कल्याण, भारत सरकार यांचे अ.शा. पत्र जा.क्र.९-३/ २०२२-Org Fmg दिनांक २६/१२/२०२४ (NMNF मार्गदर्शक सुचना)

२) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्रमांक :कृवपदुम-१२०२७/८०/२०२५-MAG-1A, दि. ३ फेब्रुवारी, २०२५

३) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्रमांक :कृवपदुम-१२०२७/८०/२०२५-MAG-1A, दि. २५ एप्रिल, २०२५

४) अवर सचिव, कृषि व शेतकरी कल्याण, भारत सरकार यांचे पत्र फाईल .क्र.२०-१९/ २०२५-NMNF (FTS १६२०४३), दि. २२ एप्रिल, २०२६

५) अवर सचिव, कृषि व शेतकरी कल्याण, भारत सरकार यांचे पत्र फाईल .क्र.२०-१९/ २०२५-NMNF, दि. २४ एप्रिल, २०२६

६)संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र जा.क्र. कृआ/रानैशेअ/प्रमाप्र/२०२६-२७/२५६-र/२०२६ दि. ३०.०४.२०२६

**प्रस्तावना :-**

सन २०२५-२६ पासून राज्यात राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान राबविण्यात येत आहे. संदर्भ क्र. १ अन्वये प्राप्त केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०२५-२६ मध्ये अभियानांतर्गत राज्यात एकूण १,७०९ गट स्थापन करण्यात आले असून एकूण २,१३,६२५ शेतकऱ्यांच्या ८५,४५० हे. क्षेत्रावर अभियानाची अंमलबजावणी ३,४१८ कृषी सखींच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

२. केंद्र शासनास महाराष्ट्र राज्यामध्ये सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान राबविण्यासाठी रु. ११६.४२ कोटी (केंद्र हिस्सा रु. ६९.८५ कोटी व राज्य हिस्सा रु. ४६.५७ कोटी) असा कार्यक्रम प्रस्तावित केला होता. त्यानुषंगाने संदर्भ क्र. ४ प्रमाणे सचिव, कृषि व शेतकरी कल्याण विभाग, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या दि. ०२.०४.२०२६ रोजीच्या केंद्र शासनाच्या प्रकल्प मंजुरी समितीच्या बैठकीमध्ये सन २०२६-२७ मध्ये राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत नवीन ४९० गट स्थापन करण्यासाठी केंद्र शासनाने संदर्भ क्र. ४ अन्वये मान्यता दिली असून सन २०२५-२६ मध्ये स्थापन केलेल्या गटांच्या दुसऱ्या वर्षीच्या कार्यक्रमासाठी रू.१०६.८७२० कोटी व सन २०२६-२७ या वर्षामध्ये नवीन स्थापन करावयाच्या गटांसाठी रू. ४४.२९२५ कोटी अशा एकूण रु. १५१.१६ कोटींच्या वार्षिक कृती आराखड्यास मंजुरी प्रदान केली आहे.

३.  केंद्र शासनाच्या प्रकल्प मंजूरी समितीच्या संदर्भ क्रमांक ४ येथील इतिवृत्तानुसार सन २०२६-२७ या वर्षाकरिता राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत प्रस्तावित केलेली अर्थसंकल्पीय तरतूद खालीलप्रमाणे आहे.

(रु. प्रत्यक्ष)

| योजनेचे नाव | केंद्र हिस्सा (प्रशिक्षण घटकासाठीचा १०० टक्के केंद्रीय सहाय्य मिळवून) | राज्य हिस्सा | एकूण |
|---|---|---|---|
| राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान | ९२२४.५२ | ५८९१.९३ | १५११६.४५ |

४.  संदर्भ क्र. ५ अन्वये कृषि आयुक्तालयाकडून प्राप्त प्रस्ताव व उक्त इतिवृत्तानुसार परंपरागत कृषि विकास योजनेच्या वार्षिक कृति आराखड्यामध्ये प्रवर्गनिहाय (सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती) वर्गीकरण उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही. तथापि, केंद्र शासनाच्या संदर्भ क्र. ५ येथील दि. २४.०४.२०२६ रोजीच्या पत्राप्रमाणे सदर योजनेंतर्गत प्रथम मदर सँक्शनची विभागणी ज्या प्रमाणात प्रवर्गनिहाय केली आहे, ते प्रमाण विचारात घेऊन प्रवर्गनिहाय निहाय वार्षिक कृति आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याप्रमाणे खालीलप्रमाणे शासननिर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

१.  केंद्र शासनाच्या संदर्भ क्र. ४, ५ व कृषि आयुक्तालयाच्या संदर्भ क्र. ६ व उपरोक्त प्रस्तावनेस अनुसरुन राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान सन २०२६-२७ मध्ये राज्यात राबविण्यासाठी केंद्र हिस्सा (६० टक्के) रु. **८८,३७,८९,०००/-** (रुपये अठ्ठ्याऐंशी कोटी सदतीस लक्ष एकोणनव्वद हजार फक्त) व राज्य हिस्सा (४० टक्के) रु. **५८,९१,९३,०००/-** (रुपये अठ्ठावन्न कोटी एक्क्याण्णव लक्ष त्र्याण्णव हजार फक्त) आणि प्रशिक्षण घटकासाठी १०० टक्के केंद्रीय सहाय्य रु. **३,८६,६३,०००/-** (रुपये तीन कोटी शहाऐंशी लक्ष त्रेसष्ट हजार फक्त) अशा एकूण रु. **१५१,१६,४५,०००/-** (रुपये एकशे एकावन्न कोटी सोळा लक्ष पंचेचाळीस हजार फक्त) एवढ्या रकमेच्या वार्षिक कृति आराखड्यास कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाचा प्रवर्गनिहाय तपशील पुढीलप्रमाणे आहे.-

| प्रवर्ग | केंद्र हिस्सा (६० टक्के) | राज्य हिस्सा (४० टक्के) | एकूण | प्रशिक्षण घटक १०० टक्के केंद्रीय सहाय्य | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | ६८,९३,५५,४२० | ४५,९५,७०,५४० | ११४,८९,२५,९६० | -- | ११४,८९,२५,९६० |
| अनुसूचित जाती | १०,६०,५४,६८० | ७,०७,०३,१६० | १७,६७,५७,८४० | --- | १७,६७,५७,८४० |
| अनुसूचित जमाती | ८,८३,७८,९०० | ५,८९,१९,३०० | १४,७२,९८,२०० | --- | १४,७२,९८,२०० |
| | --- | --- | --- | ३,८६,६३,००० | ३,८६,६३,००० |
| एकूण | **८८,३७,८९,०००** | **५८,९१,९३,०००** | **१,४७,२९,८२,०००** | **३,८६,६३,०००** | **१५१,१६,४५,०००** |

२. राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान सन २०२६-२७ मध्ये राज्यात राबविण्यासाठी होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

| | केंद्र हिस्सा (६०%) | राज्य हिस्सा (४०%) |
|---|---|---|
| **सर्वसाधारण** | मागणी क्रमांक डी -३,<br>२४०१-पीक संवर्धन,<br>१०५- खते व रासायनिक खते<br>(००)(३८)राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान (केंद्र हिस्सा ६०%) (कार्यक्रम)<br>२४०१ बी ६२४ | मागणी क्रमांक डी -३,<br>२४०१-पीक संवर्धन,<br>१०५- खते व रासायनिक खते<br>(००)(३९)राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान (राज्य हिस्सा ४०%) (कार्यक्रम)<br>२४०१ बी ६३३ |
| **अनुसूचित जाती** | मागणी क्रमांक एन-३<br>२४०१ पीक संवर्धन,<br>७८९-अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना<br>(०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना<br>(०१)(३१)राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान(एनएमएनएफ) (केंद्र हिस्सा ६०%) (कार्यक्रम) २४०१ बी ५८२ | मागणी क्रमांक एन-३<br>२४०१ पीक संवर्धन,<br>७८९-अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना<br>(०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना<br>(०१)(३२)राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान (एनएमएनएफ) (राज्य हिस्सा ४०%) (कार्यक्रम) २४०१ बी ५९१ |
| **अनुसूचित जमाती** | मागणी क्रमांक टी-५<br>२४०१-पीक संवर्धन,<br>७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) (४३) राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान (एनएमएनएफ) (केंद्र हिस्सा ६० %)(कार्यक्रम) २४०१ बी ६०६ | मागणी क्रमांक टी-५<br>२४०१-पीक संवर्धन,<br>७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) (४४) राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान (एनएमएनएफ) (राज्य हिस्सा ४० %) (कार्यक्रम) २४०१ बी ६१५ |

३. सदर योजना राबविताना खालील अटी व शर्तींचे पालन करण्यात करण्यात यावे.

१) केंद्र शासनाच्या संदर्भाधीन मार्गदर्शक सूचना, तसेच केंद्र व राज्य शासनाकडून वेळोवळी दिल्या जाणाऱ्या सूचना, केंद्र शासनाच्या निधी वितरीत करण्याच्या अटी व शर्ती इ.नुसार सदर योजनेची अंमलबजावणी करावी.

२) या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टामध्ये सदर योजनेंतर्गत मंजूर घटकनिहाय तपशील आहे.

३) सदर योजना राबविताना संबंधित शेतकरी लाभार्थी यांचे ॲग्रीस्टॅक अंतर्गत नोंदणी केलेले फार्मर आयडी, शेतजमीनीचे जिओ टॅगिंग झाले आहे, याची खात्री करावी व कृषि मॅपर प्रणालीचा अवलंब करावा.

४)        खर्चाचे लेखे सुव्यवस्थित ठेवून सदर खर्चाचे लेखा परिक्षण अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे केंद्र व राज्य शासनाला लवकरात लवकर प्रगती अहवालासह सादर करावेत.

५)        योजनेच्या वेगवेगळया बाबींवरील भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल केंद्र व शासनास प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करावा.

६)        योजनेशी संबंधित ताळेबंद व लेखापरिक्षण जमाखांची रक्कम यंत्रणेने याचा अहवाल अंमलबजावणी यंत्रणेने द्यावा. त्यामध्ये वर्षाच्या सुरुवातीला अखर्चित रक्कम व व्याजाद्वारे मिळालेले उत्पन्न स्पष्टपणे नमूद करावे. जेणेकरून पारदर्शी स्वरुपात रक्कम विचारात घेता येईल व संदिग्धता राहणार नाही.

७)        कोणत्याही परिस्थितीत मंजूर कार्यक्रमापेक्षा जास्तीचा कार्यक्रम राबविला जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

८)        सदर योजनेकरीता मंजूर झालेला निधी हा ज्या संवर्गासाठी मंजूर केलेला आहे, त्याच संवर्गासाठी खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

४.      सदर योजनेकरीता आयुक्त (कृषि) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे याना योजनेचे नियंत्रण अधिकारी म्हणून व त्यांच्या कार्यालयातील सहायक संचालक लेखा यांना आहरण व सवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५.      सदर निधी खर्च करतांना विहित कार्यपध्दती अनुसरून सर्व वित्तीय कायदे टेंडर नियामावली व नियमाचे प्रक्रियेचे वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत राहुन/CVC तत्यानुसार/CAG च्या निर्देशानुसार प्रबलित शासन निर्णय/नियम/परिपत्रक तरतुदीनुसार, बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अंमलबजावणी यंत्रणांनी करावी कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन निर्णय अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहिल.

६.      प्रस्तुत प्रशासकीय मान्यतेचा आदेश प्रकल्प मंजुरी समितीच्या (PAC) संदर्भ क्र.४ अन्वये दिलेल्या मंजुरीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

७.      सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०५०५१६५१२२२४०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUHAS MADHUSUDAN SAKPAL

Digitally signed by SUHAS MADHUSUDAN SAKPAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=01592dd98f36fbc924826517361a31b8166fce7745d35b95fa79159b8fb74478, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=82434617B1F4C6035B3CC29788B8D394A52FB3EDABFC26B4E85EBC2AF7C45FF9, cn=SUHAS MADHUSUDAN SAKPAL
Date: 2026.05.05 16:52:46 +05'30'

**(सुहास सकपाळ)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत**

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ
४. मा.सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. संचालक ( नि.व गु.नि. ) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता )मुंबई/नागपुर.
९. सर्व विभागीय कृषि सहसंचालक
१०.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
११.सहायक संचालक, लेखा, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२.अवर सचिव (कार्यासन-१४३१) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.अवर सचिव वित्त विभाग (व्यय-१४), मंत्रालय, मुंबई.
१४.निवडनस्ती (कार्यासन १अे) कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई.

----------------

शासन निर्णय क्रमांक : कृवपदुम-१३०२५/४८/२०२६-MAG-२A (E : १६४३३५५)

दिनांक:- ०५ मे, २०२६

परिशिष्ट

(Rs.in lakhs)

| | Component | Unit Cost | Year 2 cost of clusters formed in 2025-26 | | New clusters for 2026-27 | | Total Budget 2026-27 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Physical Target | Budget | Physical Target | Budget | |
| A | Under 60% GoI share and 40% State Share | | | | | | |
| | Physical Target | | 1709 Clusters Area: 85450 Ha | | 490 Clusters Area: 24500 Ha | | |
| 1.1 | Engagement of Krishi Sakhi (Community Resource Person GRP) for output based incentive @ 2 crps per cluster - 16 days per month @ (300 per day +200 for TA) per month -1.2 Lakhs/ CRP for 2 years. | 1.2 | 3418 | 2050.80 | 980 | 588.00 | 2638.80 |
| 1.2 | Awareness generation programs at Gram Panchayat, attended by GP leaders, farmers, SHG women, etc. -4 programs/ cluster/ year (per program cost- Rs 2000/-) -50-75 participants per program | 0.02 | - | - | 1960 | 39.20 | 39.20 |
| 1.3 | Output based incentive to trained Farmers @ 125 farmers per cluster Rs 4000/per acre per year (300 per month to practice NF, train more farmers, upkeep of live stock/ preparation of inputs/purchase of NF inputs from BRC and 400 per years as one time support for procurement of drums, etc) -Maximum incentive up to 1 acre per farmer | 0.08 | 213625 | 8545.00 | 61250 | 2450.00 | 10995.00 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.4 | NF certification for 125 trained farmers @ Rs. 2100/- per Ha | 0.021 | -- | -- | 24500 | 514.50 | 514.50 |
| 1.5 | Orientation programs for farmers to express willingness to initiate NF @ 2 programs per year per cluster<br>-25-30 participants per programs @ Rs 1200/- per program | 0.012 | --- | --- | 980 | 11.76 | 11.76 |
| 1.6 | Kit for enrolled farmers (study materials, Farm Diary, FAQ booket, etc) @ 1 Kit per farmer<br>Rs.200/- per farmer per Cluster | 0.002 | --- | --- | 61250 | 122.50 | 122.50 |
| 1.7 | Support for Mobile Devices for<br>CRPs @ 1 device per CRP @ Rs.4000/- | 0.04 | ---- | ---- | ---- | --- | --- |
| **2** | **Total Support for Cluster Level Activities** | | | **10595.8** | | **3725.96** | **14321.76** |
| 3 | Setting up of Bhartiya Prakritik Bio-input Resource Centre Rs. 1 lakh per BRC | 1.00 | --- | ---- | 327 | 327.00 | 327.00 |
| **4** | **Total (2+3)** | | | **10595.80** | | **4052.96** | **14648.76** |
| 5 | State /District Mission Management Cost | 2% of Total (4) | | ---- | | 81.06 | 81.06 |
| **6** | **Grand Total (4+5)** | | | **10595.80** | | **4134.02** | **14729.82** |
| **B** | Under 100% Central Share | | | | | | |
| 1 | Trained number of Krishi Sakhis / Community Resource Persons (CRP)- To be trained at NF Model demonstration farms of FMTs/KVK/AUs/LNFI<br>-Each CRP undergoes 2 training programmes of 5 days duration each ( total 10 days duration), one in pre-Kharif and one in pre-rabi<br>-Training cost @ Rs.1200/per participant per day | 0.012 | --- | --- | 980 | 117.60 | 117.60 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Recommended batch size is 25-50 participants | | | | | | |
| 2 | Trained number of farmers at training institution (KVK/AU/LNFI)<br>-Each farmer undergoes 2 trainings programs of 1 day duration in batches of 50 farmers each.<br>-Training cost @Rs 125/- per farmer per day | 0.00125 | ---- | ---- | 61250 | 153.13 | 153.13 |
| 3 | Trained number of farmers at NF clusters<br>-2 programs of 1 day duration per year per cluster, in batches of 50 farmers per cluster.<br>-Rs. 20 per farmer per day | 0.0002 | 213625 | 85.45 | 61250 | 24.50 | 109.95 |
| 4 | Output based incentive to FMT of LNFI for training and demonstration @ 1 FMT per LNFI<br>- (Rs 6000+Rs 200 for TA/DA) per month per farmer<br>-15 days per month as per actuals @Rs 400 per day+Rs 200 for TA per month as per actuals | 0.062 | 8 | 5.95 | ----- | ------ | 5.95 |
| 5 | Establishment of LNFI - Need based support@ Rs 50000 per institution, as per actuals.<br><br>i. One time Costs: Rs. 10000/-<br>-Cost of Tools, equipment for input preparation-Rs.5000/-<br>-Other infrastructure-boards, posters etc-Rs. 5000/- | 0.5 | ---- | | | | ---- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ii. Support per season for 2 years (4 seasons)- Rs. 10000<br>-Cost of Raw materials for input preparation -Rs. 4000/-<br>-Cost of Biomass Mulching material - Rs. 4000/-<br>-Cost of Seed and planting materials Rs. 2000/- | | | ----- | ---- | ----- | |
| 6 | Total for B | | | 91.40 | | 295.23 | 386.63 |
| 7 | Grand Total (A+B) | | | 10687.20 | | 4429.25 | 15116.45 |

Total Budget proposed for 2026-27 is Rs. 15116.45 Lakhs (Central Share (60%): Rs. 8837.89 Lakhs, State Share (40%): Rs.5891.93 Lakhs, 100% Central Share Training Component: Rs 386.63 Lakhs).

-----------------------------------------